म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ७८०

REFBK-0019192

ग्रं. सं. ठाणे
निबंध
७७०

# आधुनिक फटके

फटका २ रा.

भाग १ ला.

# लोकमान्यांनी नाडीपरीक्षा

REFBK-0019192

किंमत ३ आणे.

मुद्रक व प्रकाशक,

प्रल्हाद बाळकृष्ण सरदेशमुख.

सेंचरी प्रिंटींग प्रेस, मोहन बिल्डिंग, गिरगांव-मुंबई.

## हिंदभूमीचा हा सत्पुत्र चिरायु होवो !



परमेश्वरा ! भरतभूमीचा हा आवडता ' बलवंत ' विलायतेंतील आपल्या सनदशीर चळवळीनें भरतभूमीला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यांत ' बल 'वंत ठरो !

११९८२
नं. ३१८.
११९११

# लोकमान्यांची नाडिपरीक्षा.

## हा लेखक कशी करतो ?

हल्लीं गाजत असलेले लोकमान्य कोण होत हें आबाल वृद्धांस पूर्णपणें माहीत आहे तेव्हां ते सद्गृहस्थ पुण्याचे श्रीयुत बाळ गंगाधर टिळक होत हें पुनः सांगण्याचें कारण नाहीं. या ' लोकमान्य ' पदवीची पूर्व पीठिका मोठी गमतीची आणि मार्मिक आहे. दहा बारा वर्षांच्या पूर्वींचा इतिहास जर पाहूं लागलों तर ही पदवी अस्तित्वांत नव्हती असेंच दिसून येईल. किंबहुना ' रावसाहेब ' ' शेटसाहेब ' वगैरे पदव्यांचा बोलबाला त्यावेळीं फार होता असें म्हटलें तरी चालेल. त्याही पूर्वींच्या काळाचा शोध करून खुद्द महाराष्ट्राच्या ' स्वराज्यांत ' देखील पाहूं लागलों तरी त्यावेळींही या पदवीचा थांगपत्ता लागत नाहीं. मग प्रश्न असा उगवतो कीं ही बात इकडे आली कशी व केव्हां ? हिचा जन्म—

### स्वदेशीच्या झगड्यांत

—झालेला आहे. लॉर्ड कर्झन यांनीं बंगालची फाळणी केल्यामुळें बंगाल प्रांतांत लोकमताची जी लाट उसळली त्या लाटेंत ' स्वदेशी चळवळ ' ही एक जोरदार आणि भरभक्कम अशी लाट होती. या चळवळींत ' राजमान्य राजेश्री ' या चिरंतन काळ चालू असलेल्या पदवीस छाट मारण्यांत आला आणि ' देशभक्त ' श्रीयुत, लोकमान्य ' वगैरे नव्या पदव्या स्वदेशी टांकसाळेंतून बाहेर पडल्या. याच वेळीं लोकमान्य ही पदवी पुण्याचे प्रसिद्ध देशभक्त रा. टिळक यांस अर्पण करण्यांत आली आणि तेव्हां पासून या उपपदास ते लायक आहेत असें ठरविण्यांत आलें. या लेखांत लोकमान्यांची नाडिपरीक्षा करण्यांत येणार

असल्यामुळें प्रथमतःच आह्मी लोकमान्य या शब्दाची थोडक्यांत फोड केली आहे. असो, लोक. टिळक यांस जनतेनें ओळखावें ह्याप्रमाणें अद्यापही ओळखलें नाहीं असें निदान या लेखकाचें तरी प्रामाणिक मत आहे. त्यांनीं देशासाठीं देहदंड सोसला, ते उत्तम बुद्धिवान आहेत वगैरे गोष्टींबद्दल विचार करण्यांत अर्थ नाहीं. पण त्यांच्या अंगांतील खऱ्या गुणांची कोणांस पारखच झालेली नाहीं किंबहुना त्या गुणांबद्दल त्यांची वस्तुतः कोणी स्तुतीही करीत नाहींत. त्यांची आज जी स्तुति होत आहे त्यांत विशेषत्वानें त्यांचा निस्वार्थीपणा फार पुढें पुढें येत आहे. पण या लेखकाला तो गूण त्यांच्यांत तितक्या स्तुतीस पात्र असलेला दिसत नाहीं. निस्वार्थीपणा हा गूण केव्हां दिसून येतो ज्या वेळीं संपत्ति पुढें पुढें नाचत येत असतां तिला लाथाडून देण्यांत येईल अगर याहूनही उच्चतम परिस्थिती ह्मणजे आपल्याजवळ असलेली कवडीन्कवडी केवळ परोपकारार्थ खर्च केली जाते तेव्हां निस्स्वार्थीपणा पूर्णतेस गेला असें ह्मणतां येईल. हीच परीक्षा लोकमान्याच्या वागणुकीस लावून पाहिल्यास त्यांची वर्तणूक स्तुतीस पात्र होईल अशी निस्स्वार्थी दिसत नाहीं. प्रथमतः ही गोष्ट पक्की लक्षांत ठेविली पाहिजे कीं, प्रस्थापित राज्यपद्धतीशीं झगडा करूं इच्छि-णाऱ्याच्या पायाजवळ संपत्तीनें लोळण मारणें वस्तुस्थितीलाच धरून नाहीं किंबहुना तशी स्थिती प्राप्त होत नाहीं कधीं कधीं तर तशा परिस्थितीचा अवलंब केल्यामुळें आप्तइष्टांस मुकून हातीं भिक्षा पात्र येण्याचा पूर्ण संभव असतो ह्मणू-नच तशा प्रकारचा झगडा घालण्यास जनतेंतील बुद्धिवान माणसें पुढें येत नाहींत असा व्यवहारीक अनुभव आहे. तेव्हां निस्स्वार्थ बुद्धिचें प्रदर्शन होण्यास लोकमान्याची परिस्थितीच अनुकूल नव्हती व नाहीं असें मानण्यास काय हरकत आहे ?

त्यांहूनही प्राप्त असलेल्या परिस्थितींत लोकमान्यांनीं निस्स्वार्थीपणा स्तुतीस पात्र होईल असा दाखविल्याचें स्पष्ट उदाहरण जनतेपुढें नाहीं. निस्स्वार्थीपणाचा पुरावा ह्मणून कधीं कधीं असें सांगण्यांत येतें कीं, त्यांनीं देशकार्याचें महत्कार्य शिरावर घेतलें नसतें तर त्यांची सांपत्तिक स्थिति कशी

दिसून आली असती? अशी पृच्छा करणारांस प्रस्तुत नाडीपरिक्षक असें विचारतों की, न्यायमूर्ति रानडे, न्यायमूर्ति सर चंद्रावरकर वगैरे सारख्या सधन, सुखवस्तु व संसारीक गृहस्थां प्रमाणें दिसून आली नसती काय? थोडेसें खोल पाण्यांत शिरून पाहूं लागलें तर, लोकमान्यांची सांपत्तिक स्थिती वरील व्यक्तींहून भिन्न व कमी दर्जाची आहे असें सहसा दिसून येणार नाहीं. एका वावदुक टीकाकारानें एका प्रसंगीं असे उद्गार काढलेले ऐकिवांत आहे कीं, ' पुण्याच्या दोन्ही पक्षाच्या पुढाऱ्यांनीं आपले स्वताःचे वाडे बांधले आणि त्यांच्या प्रभावळींतल्या लोकांनीं आपलें शक्य तेवढें कल्याण करून घेतलें आहे. हा टीकाकार वावदूक असला तरी त्याच्याच मतासंबंधीं प्रामाणिकपणें बोलावयाचें म्हणजे त्याचें मत वस्तुस्थितीचा सर्वथा विपर्यास करणारें नाहीं. असेंच म्हणावें लागेल. इतकेंच नव्हे तर विद्वत्ता, कायदेपांडित्य व वक्तृत्व यांच्या दृष्टीनीं विचार केला तर वरील उभयतांत न्यायमूर्तींपेक्षां लोक॰ टिळक हे श्रेष्ठ ठरतात आणि या श्रेष्ठतेचा रुपेरी बेडीतील प्रतिष्ठित कारागृहवासांत त्यांनीं पूर्णपणें उपयोग करून घेतला असता तर न्यायमूर्ति रानडे अथवा चंद्रावरकर यांच्या पेक्षां लोकमान्य टिळकांची सांपत्तिक स्थिती किती तरी पटीनीं अधिक ठरली गेली असती यांत संशय नाहीं. सरदार जाहगीरदार अथवा इनामदार यांची बरोबरी करण्यासारखा, बड्या अधिकाऱ्याच्या जागेचा पगार त्या जागेवर व मुदतबंदी संपेपर्यंत नोकरी झाल्यावर पहिल्याच भपक्यांत संसार चालविता येण्यासारखी पदरांत पडणारी ग्रॅच्युइटी व पेन्शनची मदारयाला लाथाडून मातृभूमीच्या सेवेंत

परायण होण्यांत लो॰ टिळकांचा निःस्वार्थीपणा दिसतो आणि तो तसा वंदनीयही आहे. यांत वाद नाहीं. तथापि आमच्या नाडीपरिक्षेंत लोकमान्यांच्या नाडीची जो गति आमच्या स्पर्शदृष्टीला दिसते आहे तींत लोकमान्यांचा स्वार्थत्याग, अप्रतीम बुद्धिमत्ता आणि निरुतर मुत्सद्दीपणा इत्यादि कारणें त्यांच्या सर्व राष्ट्रास लोकमान्यतेची साक्ष पटवीत असली तरी त्यांच्या अंगांत जो अपूर्व व पूर्णत्वास गेलेला गूण आहे, त्या गुणाची वास्तवीक कोणी वाहवाही करीत नाहीं. लोकमान्य टिळकांची गोडवी गाणारांनीं त्यांच्या अंगांत असलेल्या दुसऱ्या एका गुणाचे जर गोडवे गाइले तर वरील गुणांपेक्षा खात्रीनें त्या गुणाचा नंबर जास्त लागेल यांत शंका नाहीं. लोकमान्यांचा आज जो अखिल हिंदुस्थानांत जयजयकार दुमदुमून राहिला आहे त्यांत वरील गुणाहून प्रामुख्यानें त्यांच्या अंगीं वसत असलेली——

## अपूर्व चिकाटी

हेंच एक आदिकारण आहे असें दिसून येतें व आम्हीं तर त्यांच्या लोकमान्यतेचीं जीं इतर कारणें दिलीं आहेत त्या सर्वांवर हेंच कारण–प्रकार पाडणारें आहे, अशा विषयीं आत्मविश्वास बळावत जातो. या त्यांच्या साहसी चिकाटीला विरुद्ध पक्षाकडून निर्लज्यपणानें ‘ हट्टीपणा ’ ‘ अहंपणा ’ असलीं घाणेरडीं नांवें देण्यांत येत असतात. पण हा एकच गूण त्यांच्या कर्तृत्वशक्तीस उत्तम प्रकारें पोषक झालेला आहे आणि लोकमान्यांच्या अंतःकरणांत ‘ सेवकी ’

देशाभिमान नसल्यामुळें त्या खऱ्या तेजोमय हिऱ्यास चिकाटीचें कोंदण उत्तम शोभा आणीत आहे. साधी कैद, सक्त मजुरीची कैद, हद्दपारी अशी प्रकारच्या दैहिक यातना भोगून वयाच्या ६५ व्या वर्षी केवळ क्षुद्रबुद्धीच्या एका माणसाच्या वल्गनांची खोड मोडण्यासाठीं लोकमान्याहून दुसरा कोणताही माणूस परदेशास जाण्यास तयार झाला नसता. फार कशाला? केवळ एकदाच 'तुरुंगा'ची महायात्रा होतांच आमचे भालदार चोपदार शिलेदारीचा पोषाख फेकून देऊन अर्धांगीच्या अंगावरील सुवर्ण-वृद्धी करण्याकडे धांवत सुटलेले आज पहावयास सांपडतील. फार काय सांगावें 'यम' स्वरूप धारण करून जनतेला भेडसावण्यासाठीं पुढें आलेले कमांडर इन् चीफ, विरुद्धपक्षाची विनवणी करून अर्धी भाकरी मिळविण्याच्या उद्योगास लागलेले पाहून लोकमान्यांच्या अंगांतील अपूर्व चिकाटीचें जितकें कौतुक करावें तितकें थोडेंच असें स्पष्ट म्हणणें भाग पडते. तेव्हां थोडक्यांत नाडीपरीक्षा करावयाची तर हा लेखक एवढेंच म्हणतो कीं लोकमान्यांची स्तुती स्तोत्रें गाणारांनीं या चिकाटीचा अवलंब केला तर फार बहार होणारी आहे आमचे हे गण असें करतील काय?

---

# नाडीपरीक्षा पहिली.

जनतेला शिक्षण थोड्या खर्चांत देऊन त्यांच्यांत स्वदेशाभिमानाची खरी जागृति व्हावी म्हणून कै० विष्णुशास्त्र्यांनीं चार बुद्धिवान आणि श्रीमंतीस लाथाडून देणारीं माणसें मिळविलीं आणि त्यांनीं पुणें येथें आर्यभूषण छापखाना, केसरी, मऱ्हाठा, वर्तमानपत्रें, न्यू इंग्लिश स्कूल, नवीन किताबखाना आणि चित्रशाळा इतक्या संस्था चालू केल्या. यापूर्वींच शास्त्रिबुवांनी आपल्या निबंध मालेंतील मधुर पण तीक्ष्ण वाणीनें महाराष्ट्रांस खडबडावलें होतें त्यांतच वरील संस्थांची भर पडल्यामुळें पुणें शहर देशाभिमानाचें माहेर घरच होऊन बसलें

या संस्थेची भरभराट त्या काळीं अपूर्व होती पण ' कीं तोडिला तरु फुटे अगखी असने ' या न्यायानें केसरी-मऱ्हाठा वर्तमानपत्रांवर कोल्हापूरचे कारभारी रा. बर्वे यांणी बेअब्रूची फिर्याद केली या फिर्यादीची भाकड कथा देऊन आजच्या महर्गतेच्या काळांत वाचकास आर्थिक चाट मारण्याचा आमचा विचार नाहीं. या फिर्यादीस कारणीभूत झालेले ज्ञानप्रकाश पत्राचे संपादक व रा. रानडे आणि कोल्हापूरचे बातमीदार रा. भिडे यांची न्यायासनानें गठडी वळविल्यामुळें केसरी मराठ्याचे संपादक कै० रा. आगरकर व आमचे लोक. टिळक यांस माफी मागूनही डोंगरीची हवा १०१ दिवस खावी लागली. लोकमान्यांच्या या नाडीपरीक्षेच्या लेखांत एक गोष्ट वाचकांनी पक्की लक्षांत ठेविली पाहिजे. लोकमान्यांस ज्या ज्या वेळीं आपत्ती भोगाव्या लागल्या आहे त्या त्या वेळीं त्यांनी यत्किंचितहि कच खालेली नाहीं. पण ती आपत्ती त्यांच्या स्वतःच्या कृतीचें फळ कधींही नव्हतें. दुसऱ्यांनी अहेतुक क्रिया करावी आणि त्याचे दुष्ट व घातुक परिणाम लोकमान्यांनीं सहन करावें हा लोकमान्यांच्या आयुष्यांतील एक विशेष गूण आहे. मऱ्हाठा वर्तमान पत्रांत लिहिला गेलेला लेख लोकमान्यांचा नव्हता पण लेखक किंचित कच खात आहे असें पहातांच रा. रा. टिळक यांणी कंबर कसली आणि रणांगणांत उभे राहिले. या खट-ल्याच्या वेळीं फंड उभारण्यांत आला होता पण हा फंड आणि अलिकडचे श्रीशिवाजी फंड व होमरूल फंड यांची तुलना करूं लागल्यास ' नर करणी करे तो नरका नारायण हो जाय ' ही कवीरुक्ती खरी ठरते. या खटल्यामुळें रा. बर्वे यांची अब्रू साफ झाली किंवा अधिक मलीन झाली हें ठरविण्यांत अर्थ नाहीं पण या खटल्याच्या अंतीं दोन्हीं पक्षास दैनिक आपत्ती भोगाव्या लागल्या. वर निर्दिष्ट केलेल्या संस्थांचें उत्पादक विष्णुशास्त्री कैलासवासी झाले ! आणि रा. बर्व्यांचा एकुलता एक हाता तोंडी आलेला सुशिक्षित पुत्र काळानें ओढून नेला. या खटल्यांत कित्येक साधु ह्मणविणाऱ्या पुरुषांची जनतेस चांगली ओळख पटली आणि वरील देशोद्धाराच्या कोवळ्या रोपड्यास कुऱ्हाडीचा घाव बसला यांत संशय नाहीं.

---

# नाडीपरीक्षा दुसरी.

लोक० टिळक ज्या पिढींत जन्मास आले त्या पिढींस लोकमान्यांसारख्या तडफीच्या माणसाची जरूरी नव्हती ह्मणून ह्मणा अगर त्यांचा जन्म एक दोन पिढ्या आगाऊ झाला ह्मणून ह्मणा पण त्यांच्या जन्मामुळें त्या वेळच्या पिढिशीं त्यांचा पुष्कळ वेळां खटका उडालेला आहे. अशाच प्रकारचा एक खटका उडाल्यामुळें लोकमान्यांच्या नाडीची दुसरी परिक्षा झालेली आहे. न्यू स्कूल इत्यादि संस्था मूळ स्थापन करणारांपैकीं लोकमान्य कै. रा. माधवराव नामजोशी हे होते. पण न्यू स्कूलचीं वाढ कॉलेजापर्यंत गेल्यामुळें इतर माणसांची गरज सहज वाटूं लागली. या इतरे जनः पैकींच मि. गोखले अथवा आन. गोखले आणि आतां कै गोखले हे एक होते. खरें पाहिलें तर रा. गोखले संस्थानच्या वातावरणांत वावरलेले तेव्हां त्यांनीं या देशहिताच्या भानगडींत गडबडगुंडा केला नसता तर विशेष अडलें असतें असें नाहीं. पण ह्मणतातना कीं 'दैवी विचित्रा गतिः' त्याप्रमाणें मि. गोखले यांचे पाऊल या सोसायटींत पडल्यापासून कलहास प्रारंभ झाला. या कलहास कारणीभूत कोण, आगळीक कोणाची वगैरेचीं प्रेतें उकरण्याची आमची इच्छा नाहीं. पण ज्या वृक्षाची अत्यंत बाल्यावस्थेंत जोपासना केली त्या वृक्षाचीं मधुर फळें त्या परिश्रम करणाऱ्या 'माळींदादांस' चाखण्यास मिळालीं नाहींत हें वस्तुस्थितीला नक्की धरून आहे. कलहाचा अतिरेक ह्मणजे फाटाफूट हा जगाचा न्यायच ठरला असल्यामुळें लोकमान्यांनीं सपुण्य फलदायी वृक्षास प्रेमानें मारलेली मिठी मोठ्या कष्टानें सोडावी लागली. या कलहाचें मूळ 'जेस्पूइट लोकां' प्रमाणें निरिच्छ सेवा असावें असें ह्मणतात व त्या धोरणानेंच लोकमान्यांनीं आपला राजीनामा लिहिला आहे असेंही पुष्कळदां ध्वनित झालेलें आहे. तें कसेंही असो. मि. गोखल्यांचा पाय सोसायटींत पडल्यानंतर लोकमान्यांस राजीनामा द्यावा लागला. ही गोष्ट चंद्रसूर्याप्रमाणें खरी आहे. मि. गोखल्यांनीं

हा कलह केला नसेल तर निदान उत्पन्न झालेला कलह मिटविण्याचा प्रयत्न तरी त्यानीं केलेला नाहीं आणि या आमच्या म्हणण्यास पुरावा हाच कीं, संस्थेचे उत्पादक जर राजीनामा द्यावयास तयार झाले होते तर त्या संस्थेच्या भरभराटीच्या वेळीं शिरलेले गोमाजीही त्याच उपायांनीं बाहेर पडावयास पाहिजे होते. पण 'लोभ मूलानि पापानि' या न्यायानें भरभराट पावत जाणाऱ्या वृक्षाचीं 'वाहवा वहोत खाशीं' हीं मधुर फळें चाखण्याची अभिलाषा मि. गोखले यांस उत्पन्न झाली आणि त्या फळासही लाथाडून केवळ स्वमताच्या अभिमानासाठींच लोकमान्यांनीं त्या संस्थेंतून आपला पाय काढून घेतला. यावेळीं एके बाजूस लोकमान्यता व सत्व हीं रा टिळकांस ओढीत होतीं तर दुसऱ्या बाजूनें 'स्वमताभिमान' खेचीत होता. रा. टिळकावर 'सस्तीलोकप्रीयता' मिळविण्याचा एक घाणेरडा आरोप त्यांच्या गादीलोडावर लोळणाऱ्या विरुद्ध पक्षाकडून करण्यांत येत असतो. पण तो किती फोल आहे हें या उदाहरणावरून दिसून येतें. असलीं उदाहरणें त्यांच्या तजोमय कारकीर्दींत पुष्कळदां घडून आलेलां आहेत हेंहीं येथें नमूद केलें पाहिजे. या संस्थेंतून लोक० टिळकांनीं अंग काढून घेतल्यानंतरही त्यांची या संस्थेबद्दलची कळकळ अणुरेणुनेही कमी झालेली नाहीं. एकदां असें घडून आलें कीं, मि. डिग्बी हे पुण्यास आले व त्यांनीं रा. नामजोशाजवळ न्यू स्कूल संस्था पाहण्याची इच्छा प्रगट केली; रा. नामजोशी हे 'नाहीं बंदी चवलीच घेईन' या रानवट पण अत्यंत सचोटीच्या काथवटी बाण्याचे असल्यामुळें त्यांनीं मि. डिग्बी यांच्या बरोबर जाण्याचें साफ नाकारलें; आणि विशेष ध्यांनांत ठेवण्यासारखी गोष्ट हीच कीं तसें करण्याचें लोक. टिळकांनीं मोठ्या आनंदानें कबूल केलें. लोकमान्यावर 'आग्रही स्वभावा'चा शिंतोडा उडविणारांनीं ही गोष्ट ऐकून लाजेनें मानच खालीं घातली पाहिजे.

या संस्थेसंबंधानें लोक. टिळकांच्या पुष्कळ आख्याइका आहेत. लोक. टिळक या संस्थेंतून बाहेर पडल्यानंतर अशीच निराळी संस्था काढण्याबद्दल त्यांच्या पुष्कळ मित्रांनीं बऱ्याच वेळां डाळ घातलेली आहे. इतकेंच नव्हे तर

निशानपक्षीं या संस्थेवर केसरीद्वारा भंभेरी उडविण्याबद्दलही कांहीं मित्रांनीं शिफारस केलेली होती पण यापैकीं एकही गोष्ट त्यांनीं केलेली नाहीं यावरून त्यांच्या थोर मनाची साक्ष पटत नाहीं काय ?

याचसंबंधानें अशी एक आख्यायिका आहे कीं, एकेवेळीं लोकमान्यांच्या गैरहजेरींत एका चतुर आणि बुद्धिवान सूज्ञानें न्यू इंग्लिश स्कूल संबंधानें एक टीकात्मक लेख लिहिला. ही टीका योग्य वेळीं व योग्य प्रकरणींच करण्यांत आली होती. तरी पण या लेखकाची आणि लोकमान्यांची जेव्हां गांठ पडली तेव्हां लोकमान्यांनीं जें मार्मिक उत्तर दिलें होतें तें ऐकून वरील लेखकांसही आश्चर्य आणि आनंद झाला तें उत्तर असें होतें; ‘ आपण टीका केली ती मुद्देसूद आहे आणि अशाच प्रकारच्या दुसऱ्या कोणत्याही संस्थेनें अशा प्रकारचें वर्तन केलें असतें तर त्याबद्दल मी सुद्धां अशीच टीका केली असती पण तशा प्रकारच्या टीकेला न्यू स्कूल ही संस्था अपवादात्मक आहे आणि त्यास कारण इतकेंच कीं, ‘ विषवृक्षमपि संवर्ध्य न च्छेतुमर्हति ’ याचा अर्थ तुमच्या लक्षांत आला असेल. ’ या उत्तरावरून लोकमान्यांचें अंतःकरण किती उदार आणि पोक्त विचारांनीं परिपूरित आहे हें स्पष्ट होतें. लोकमान्यांनीं वरील उत्तरांत जें संस्कृत वचन उद्धृत केलें आहे त्याचा सरळ अर्थ आमच्या वाचकांस कदाचित समजणार नाहीं ह्मणून तो आह्मी याखालीं देतों. कोणताही वृक्ष मग तो विषाचाही असला तरी जर आपण एकदा संवर्धन केला ह्मणजे पाणी घालून वाढविला तर तो आपल्याच कडून मुळासकट उपटून टाकण्यास योग्य होत नाहीं. या एकाबाक्यांत फार मोठा गूढार्थ भरलेला आहे. ज्या सजीव प्राण्यावर, ज्या निर्जिव वस्तूवर अथवा ज्या देशावर आपण एकदा स्वत्व प्रस्थापन केलें त्या प्रमाणें, वस्तुनें अगर देशानें जरी कृतघ्नपणाचें वर्तन करण्यास सुरुवात केली तरी स्वत्व स्थापन करणाऱ्याकडून तो शिक्षेस पात्र होत नाहीं. या एकाच तत्वाशीं आपलें वर्तन निगडित करून जर प्राणिमात्र वागू लागेल तर जगांतील कितरी भयंकर अनर्थ टळतील! पण असें होईल काय ?

---

# नाडीपरीक्षा तिसरी.

लोकमतास अगदीं विरुद्ध दिशेचें वळण देण्यासाठीं प्रस्थापित केल्या गेलेल्या न्यू स्कूलादि संस्थांतून धैर्यानें आणि स्वार्थावर तिलांजली देऊन पुढें आलेल्या लोक. टिळकांनीं विशेष विरोध न दाखवितां राजीनामा दिला. इतकेंच नाहीं तर त्याज्य संस्थेच्या विघातासही लोक. टिळक तिळमात्रही तयार झाले नाहींत हें पाहून त्यांच्या शत्रुपक्षांतील लोकांस विरोध अथवा लोक० टिळकांचा सार्वजनिक रीत्या नायनाट करण्यास जास्तच हुरूप आला. केसरी वर्तमानपत्र सुधारणी थैयथैयटास पूर्ण विरोध असल्यामुळे लोक० टिळकांचे जे कित्येक स्वार्थसाधु शत्रु होते त्यांस पुण्यांतील सुधारकांची जोड मिळून तो पक्ष आपल्या समजुतीनें बळावत चालला होता. लोक० टिळकासारख्या पुरायणवादी माणसास एकाकी गाठून केव्हांच नामशेष करूं अशी त्यांची वालंवाल खात्री झाली होती. परंतु लोक० टिळकांच्या नाडीची खरी परीक्षा झाली नसल्यामुळें त्यांचे ते सर्व प्रयत्न निर्फळ होऊन त्यांचेच दांत त्यांच्याच घशांत कसे पडले हें जनतेस हल्लीं कळून चुकलेच आहे. परंतु आह्मी ज्या कालाची हकीगत लिहीत आहोत त्या कालीं लोक. टिळकाविरुद्ध एक अत्यंत घाणेरडा प्रयत्न चालू झाला होता. या वेळीं एकंदर परिस्थिति कशी होती याचें दिग्दर्शन करणें जरूरीचें आहे.

कै० विष्णुशास्त्री यांणीं एकसमयावच्छेदें करून ज्या संस्था स्थापन केल्या होत्या त्यांचे एकछत्री साम्राज्य या वेळीं नष्ट झालें होतें. त्या साम्राज्याचे आतां विभाग झाले होते. नवीन किताबखाना व चित्रशाळा या संस्था पूर्ण स्वतंत्र झाल्या होत्या. न्यू स्कूल व फर्ग्यूसन कालेज ही जोड संस्था निराळी पडली होती. आर्यभूषण छापखाना व त्याच्या अंगभूत असलेलीं केसरी—मऱ्हाटा वर्तमानपत्रें हीं अलग झालीं होतीं. ही शेवटची संस्था रा. केळकर रा. गोखले व रा. टिळक यांच्या जवळ जवळ मालकीची बनली होती. या संस्थेला रा. केळकरांनीं द्रव्याची मदत केली होती. या ठिकाणीं रा. हरीभाऊ

गोखले यांचा थोडासा पूर्वेतिहास दिला तर अस्थानीं होणार नाहीं. कारण या व्यक्तीनें आपल्या पुढील आयुष्यांत निरनिराळे चमत्कारिक प्रकार करून दाखविले आहेत

रा. हरिभाऊ मूळचे राहणारे कोकणांतले. यांचें शिक्षणही यथायथाच झालेलें होतें. ते प्रथम उपजीवनार्थ मुंबई मुक्कामीं येऊन थडकले. त्यांच्या वेळीं जरी शिक्षण असलेल्या माणसांची मुंबईत आजच्या प्रमाणें कुत्तर ओढ नव्हती तरी शिक्षणशून्य माणसास मुंबईस उपजीवनाचें चांगलेसें साधन नव्हतें. तेव्हां त्यांनीं मुंबई येथील त्या वेळीं भरभराटींत असलेल्या 'नेटीव्ह ओपीनियन' छापखान्यांत नोकरी धरली. हल्लींच्या प्रमाणें त्या वेळीं 'ब्राह्मणी' चहापान गृहाची साथ असती तर रा. हरीभाऊंच्या पुढील आयुष्यक्रमांत कदाचित बराच फरकही पडला असता. असो. नेटीव्ह ओपिनियन छापखान्यांत मिळणारे वेतन अपुरें होतें म्हणून म्हणा न्याय० रानडे म्हणतात त्याप्रमाणें दरिद्री असून महत्वाकांक्षी असणें हा ब्राह्मणाचाच जन्मसिद्ध हक्क आहे म्हणून म्हणा ते फावल्या वेळेंत ते दर मंगळवारीं रस्तोरस्तीं हिंडून केसरीची विक्रीही करीत असत. नेटीव्ह ओपिनियन पत्राची स्थापना 'हिंदी राष्ट्रमत' स्पष्टपणें जनतेपुढें व विशेषतः अधिकाऱ्यांपुढें मांडण्यासाठीं वै. ला० रावसा० मंडलीक यांणीं केली असल्यामुळें लोक० टिळक या छापखान्यांत साहजिकच नेहमी येत जात असत. अर्थात त्यांस हा 'कोकणी च्छात्र' नेहमी दृष्टीस पडत असे. रा० हरीभाऊंच्या नशिबानें जोर केल्यामुळें लोक० टिळकांनी त्यांस पुणें मुक्कामीं आर्यभूषण छापखान्यांत पगारी कामगार म्हणून नेलें. पुढें लोक० टिळकांच्याच कृपेनें त्यांस त्या भरभराटींत असलेल्या छापखान्याची म्यानेजरी मिळाली असो.

आतां आपण पूर्वीच्या इतिहासाकडे वळूं. लोक० टिळक न्यू स्कूल संस्थेतून बाहेर पडले खरे पण केसरी वर्तमानपत्राची अंशतः मालकी त्यांच्याकडे होतीच. यावेळीं केसरी वर्तमानपत्र पुण्यामुंबईच्या सुधारकांच्या डोळ्यांत व विशेषतः कर्तृत्व शून्य पुण्याच्या सुधारकांच्या डोळ्यांत फार सलत होतें. याच वेळीं सरकारी अधिकाऱ्यांनीं सुधारकांस कक्षेंत मारण्यासाठीं रमन

वयाच्या कायद्याचें बिल कौन्सिलपुढें आणलें. या बिलाच्या उहापोहामुळें तर ' केसरी ' हा शब्द पुण्याच्या सुधारकांस तळव्याची आग मस्तकांत नण्यास पुरसा झाला होता. या बिलाच्या चर्चेत वादाचा मुद्दा एकच होता. समाजांत सुधारणा करणें असल्यास ती जनतेच्या सुखासमाधानें घडवून आणावी कीं, परकीय आणि ह्मणून विशेष प्रकारानें सामाजिक गोष्टींत पूर्ण अज्ञानी अशा अधिकाऱ्यांनीं ती समाजाच्या बोकांडीस बसवावी. यावेळीं हेंही येथें नमूद करून ठेविलें पाहिजे कीं एके वेळीं अत्यंत मैत्रीनें वागणारे कै० अगरकर व टिळक यांच्यांत मतभेद होऊन ' सुधारक ' पत्राचा जन्म झाला होता. पूर्वात्य तत्वज्ञान व सामाजिक रचना यांचा व्यावहारिक दृष्ट्या विचार न करतां आणि हिंदी समाजाची सद्यःस्थिती कशी आहे याचाही विचार मनांत न आणतां केवळ पाश्चिमात्य तत्ववेत्यांचीं एकांगी विवेचनें वाचून रा० अगरकर हे सुधाकर पत्रांत हिंदी समाजास ' धूलिका ' उडवित होते. या वादाच्या वेळीं ' केसरी ' आणि ' सुधारक ' यांच्यांत जें बौद्धिक युद्ध चालू होतें तें अवर्णनीय असून कौतुक करण्यासारखें होतें. अशा प्रकारचें युद्ध पुनः पुनः पहाण्यास मिळण्याचें सुदैव जनतेच्या कपाळीं नव्हतें ह्मणूनच कै० रा० अगरकर यांचें अकालीं निधन आलें. असो. या वादामुळें तर ' केसरी ' व त्याचे संपादक टिळक हे सुधारकांस जळीं काष्टीं पाषाणीं दिसूं लागले. तेव्हां रा० टिळक यांस निःशस्त्र कसें करता येईल या गूढ विचारांत पुण्याचे सुधारकाग्रणी पडले यांत नवल तें काय ? कै० रा० केळकर जातीचे हुषार खरे पण त्यांची तंद्री कांहीं निराळयाच कामीं लागत असल्यामुळें ते सुधारकांस पडावे तसे उपयोगी पडले नाहींत तरी पण त्यांच्याच हातून निःशस्त्र क्रिया घडवून आणली तर घडेल असा त्या वेळच्या सुधारकांचा अंदाज होता व त्याप्रमाणें त्यांनीं घडवून आणलें किंबहुना रा० केळकरास तशी बुद्धि झाली. हा प्रकार मोठ्या गमतीचा आणि धडा घेण्यासारखा आहे.

केसरी वर्तमानपत्राची मालकी विभागलेली होती हें पूर्वीं सांगितलेंच आहे. तेव्हां केसरींत प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीसंबंधानें रा. केळकर व म्यानेजर रा.

गोखले यांनीं व्यवस्था पहावी आणि लोक० टिळकांनीं केसरी पत्राचें संपादकत्व करावें असा 'तह,' ठरला होता. सम्मति वयाच्या बिलाची जोराची चर्चा चालू असतां पुणें मुक्कामीं शाहू नगरवासी नाटक मंडळी आपले खेळ करीत होती. ही नाटक मंडळी आणि कै. केळकर यांचें किती 'मेतकूट' होतें हें डोळे उघडून पहाणाऱ्या जनतेस चांगलें विदित होतें; अर्थात या मंडळीच्या जाहितीस केसरींत वाटेल तेथें वावरण्यांत पूर्ण मुभा होती. या मंडळींच्या ताब्यांत असलेल्या नाटकगृहांत 'सम्मत्ति वयाच्या बिला' विरुद्ध सभा भरविण्यासाठीं लोक० टिळकांनीं मंडळीची परवानगी मागितली. खरें पाहिलें असतां नाटक मंडळीस नियमित दिवशीं नियमित काळीं तोफांची धडेबाजी उडविण्या पलीकडे कांहींच कर्तव्य नव्हतें पण सुधारकांच्या चिथावणीनें म्हणा अगर गणपतरावजीच्या तोफनें आयत्यावेळीं रंजुक खाल्लीं म्हणून म्हणा पण तें नाटकगृह लोक० टिळकांस सभा भरविण्यासाठीं मिळालें नाहीं. नाटक मंडळीच्या कृत्याबद्दल लोक० टिळकांस बरेंच वाईट वाटलें पण त्याबद्दल त्यांनीं नाटक मंडळीची कीवच केली. नाटक मंडळीनें केलेला हा अव्यापारेषु व्यापार लोक० टिळकांस आवडला नाहीं. सदर नाटक मंडळीच्या जाहिराती 'केसरींत वाटेल तेथें नाच करीत हें पूर्वीं सांगितलें आहेच. केसरीच्या इरसाल म्हणजे मज-कुराच्या आंतील भागावर कोणतीही जाहिरात माझ्या परवानगीवाचून दिली जाऊं नये.' लोक० चें हें फर्मान म्यानेजरांनीं कबूल केलें खरें पण केसरीचे दुसरे मालक रा. केळकर यांची मर्जी ही त्यांस मोडण्याचें त्यांस धैर्य होइना! तेव्हां त्यांनीं एक अजब युक्ति लढविली. केसरीचे आतील १० रकानें रकानाच्यां रूपांत तयार होईपर्यंत लोक० टिळकांच्या तर्फे एक माणूस छापखान्यांत रहात असे. हें सरकाने पूर्ण तऱ्हेनें पुरें झाल्यावर म्हणजे सुमारें पहाटेस ३-४ वाजतां हा माणूस घरीं निघून येत असे. लोक० टिळकांचा वरील फर्मान सुटल्यावर पुढील मंगळवारच्या केसरींत नाटक मंडळीची जाहिरात फडकावयाची होती. पण तिला लोक० टिळकांनीं आमच्या बाजूस मज्जाव केला होता. रा.

केळकरांची इच्छा त्या जाहिरातीनें पूर्वीप्रमाणेंच संचार करावा अशी होती तेव्हां म्यानेजर रा. गोखले यांस मोठा पेंच पडला. शेवटीं जुन्यापुराण्या झालेल्या अन्नदात्यांशीं बेइमान होऊन त्यांनीं रा. केळकरास खूष करण्याची एक अजब युक्ति योजली. लोक० टिळकांचा माणूस १० रकानें नेहमीच्या स्वरूपांत आहेत असें पाहून निघून गेला. या नंतर अधिकाऱ्यांच्या हुकुमावरून सदर रकानें दोन दोन ओळींने वाढवून शाहू 'नगरवासी नाटक मंडळीची जाहिरात आंतल्या अंगीं दडपण्यांत आली. झालें, दुसऱ्याच दिवशीं गोखले व लोक० टिळक यांच्यांत खटला झाला. या खटल्याचा फायदा घेऊन पुण्याच्या सुधारकांनीं लोक० टिळकांस निःशस्त्रधारी करण्याच्या प्रयत्नाचा फासा मोठ्या कौसल्यानें टाकला. हा फासा असा होताः—आर्यभूषण छापखाना आणि केसरी यांची फारकत करण्याचें ठरलें. या फारकतींत एकट्या केसरी मराठा वर्तमानपत्रावर दहा हजार रुपयांच्या कर्जाचा बोजा लादण्यांत आला. यावेळीं रा. केळकर व गोखले या जोडीनें असा फासा टाकला कीं, ज्यांस केसरी–मऱ्हाठा वर्तमानपत्रें पाहिजे असतील त्यानें दहा हजार रुपयांचें कर्ज सोसण्यास तयार झालें पाहिजे; तसेंच लोक० टिळक केसरी–मराठापत्रांतील आपला हक्क सोडून देण्यास तयार असतील त्यांस रोख दहा हजार रुपये देण्यास दुसरा पक्ष तयार आहे. हा फासा ज्या वेळीं टाकण्यांत आला होता त्या वेळीं लोक० टिळकांची आर्थिक परिस्थिती विशेष चांगल्या प्रकारची नव्हती किंबहुना ते जेमतेम संसार चालविण्याच्या स्थितींतच होते. तेव्हां दहा हजाराचा गठ्ठा एकदम डोळ्यापुढें दिसतांच त्यांच्याच परिस्थितींत असणारा कोणताही माणूस सहज विरघळला असता इतकेंच नाहीं तर त्यानें त्या रकमेला कदाचित दुसरें वर्तमानपत्रही काढण्याचा बेत केला असता. पण लोक० **टिळकांच्या नाडीची** परीक्षा पुण्याच्या सुधारकांस व्हावी तशी झाली नव्हती असेंच पुढें घडून आलेल्या गोष्टीवरून ह्मणावें लागतें. रा केळकर व रा. गोखले यांस पुढें करून आपणावर हा सुधारकी मारा होत आहे

ही गोष्ट लोक० टिळकांनीं तेव्हांच ताडली. त्यांनीं या प्रश्नानें असें उत्तर दिलें कीं, " आर्यभूषण छापखाना कोणीही घेवो पण माझ्या केसरीचा ताबा मात्र कोणासच मिळावयाचा नाहीं. मग तो ताबा कायम ठेवण्यासाठीं कितीही हजारांची हानि सोसावी लागली तरी ती सोसण्यास मी तयार आहे ' या उत्तरामुळें पुण्यांतील सुधारक चकित झाली हें सांगावयास नकोच. आपण सोडलेला बाण योग्य स्थळीं न लागतां त्यानें उलट खालीं हें पाहून सुधारक चमूस वाइट वाटणें सहाजिक आहे. पण त्यास उपाय काय ? लोक० टिळकांच्या नाडीची योग्य परिक्षा त्यांस झाली असती तर त्यांनीं हा भूर्खपणाचा खेळ खेळलाच नसता. असो यापुढें केसरी वर्तमानपत्र एकट्या लोक० टिळकांच्या मालकीचें झालें.

---

## नाडीपरीक्षा चवथी.

या नाडीपरीक्षेचा आरंभ मोठ्या चमत्कारिक रितीनें झालेला आहे. कोणी बडे इंग्रजी अम्मलदार सहल करतां करतां रायगडावरील श्रीशिवाजी महाराजांच्या समाधी सन्निध गेले. या साहेबांस मऱ्हाठी राज्य संस्थापक थोर माणसाच्या समाधीची अत्यंत अवहेलनास्पद स्थिती पाहून साहजिकच रडूं कोसळलें काय चमत्कार आहे पहा. ज्या महाराजांचे सावत्र वंशज गादीवर डुलत असतां आणि त्याच महाराजांच्या सेवकांचे सेवक महाराजाधिराज वगैरे लटक्याच पदव्या आपल्या नांवामागें लटकावून ' घी शक्कर ' मध्यें चूर असतां श्री० शिवाजी महाराजांच्या समाधीची यांपैकीं एकासही वास्तपुस्त नसावी हें अखिल राष्ट्राचें दुर्भाग्यच नव्हे काय ? शिवाय इंग्रजी शिक्षण म्हणजे ' वाघिणीचें दूध ' या मंत्राचा अहोरात्र जप हिंदुस्थानांत दुमदुमून राहिला

असतां त्या परकीय दुभाचा परिणाम ' खडेंखाशी ' पलीकडे होऊं नये यांतील मर्म काय ? असो तें कसेंही असलें तरी श्री० शिवाजी महाराजांची आठवण करून देण्यास ' म्लेंच्छ ' माणूस उपयोगी पडावा हें गो ब्राह्मण प्रतिपालक श्री० शिवाजी महाराजांचें सुदैवच होय !

सदर इंग्रजी थोर अधिकाऱ्यास श्री० शिवाजी महाराजांच्या समाधीची च्छिन्नविछिन्न स्थिती पाहून नुसतें वाइट वाटलें नाहीं तर त्या समाधीची योग्य प्रकारची जोपासना ' गोब्राह्मणां ' कडून न झाल्यास निदान सरकारानें तरी करावी अशा अर्थाचा एक पत्रव्यवहार त्यांनी मुंबईच्या ' टाइम्स ' वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केला. हा पत्रव्यवहार प्रसिद्ध होतांच आमचे ' गोब्राह्मण ' खडबडून जागे झाले. तरी पण त्या पत्रव्यवहाराचा ' शंखनाद ' ' शुपुस ' केसरीच्या कर्णरंध्रावर पडावा तसा पडला नाहींच. तदनंतर श्री० शिवाजी महाराजांचे स्मारक अवश्य झालें पाहिजे अशाबद्दल पुण्याचे अर्धे शहाणे अर्वाचीन नाना रावसा० रानडे यांणी दुसरा एक पत्रव्यवहार करून स्मारकाची उठावणी केली अशा प्रकारें ' म्लेंछ ' व पट्टीचे सुधारक ह्मणून ' अर्धवट म्लेंछ ' अशा दोघांनी श्री० महाराजांच्या स्मारकाची तळी उचलल्या नंतर त्या वेळच्या राजेश्री टिळकांनी तो प्रश्न हातीं घेतला. याच सुमारास मुंबईस हिंदु-मुसलमानांचे दंगेही झाल्यामुळें श्री० शिवाजी महाराजांचे उत्सव आणि गणपती उत्सव यांचें पीक कल्पनेच्या बाहेर पिकलें. गणेशोत्सवांत श्री० शिवाजी महाराजांच्या शौर्याची, धैर्याची, वीरश्रीची वगैरे वाहवा होऊं लागली. या गणेशोत्सवांत श्री० शिवाजी महाराजांची वर्णनें झालींच पण त्याच्याच बरोबर समाजांत अततांईपणानें वाटेल त्या सुधारणा करूं इच्छिणाऱ्या सुधारणांची हजेरी चापून घेण्यांत आली. याच सुमारास श्री० शिवाजी महाराजांनी अफझुलखानाचा वध केला तो नीतीला अनुसरून होता कीं अनीतीचा होता याबद्दल उहापोह सुरूं झाला. श्री० शिवाजी महाराजांच्या वेळचा काळ आणि इंग्रजी साम्राज्यछत्राच्या सावलीचा काळ यांत महदंतर होतें व आहे तेव्हां

या प्रश्नाचा उहापोह खरोखर पहातां होण्याचें कांहीं. कारण नव्हतें पण जाणत्या माणसाचा मेंदू एकदा भराऱ्या खाऊं लागला ह्मणजे तो कोठवर जाईल हें सांगतां येत नाहीं. हा वध ' स्वसंरक्षणार्थ ' करण्यांत आला असें त्यावेळीं सांगण्यांत येत होतें इतकेंच नाहीं तर ' स्वराज्य ' स्थापन करणारास असले ' खून ' माफ असतात असेंही प्रतिपादण्यांत येत होतें. त्यावेळच्या अधिकाऱ्यांच्या मन:स्थितीचा विचार करता अशा प्रकारचें प्रतिपादन त्यांस साहजिकच कर्णकटु झालें. आह्मी मागच्या वाक्यांत ' त्यावेळच्या ' हे शब्द मुद्दाम घातले आहेत. कारण त्या काळा जे श्री० शिवाजी महाराज ' बंडखोर ' गणले जात होते व त्यांचे लंगोटे मावळे ' चोराचे भागीदार ' ह्मणून दिमाखानें सांगण्यांत येत होतें तेच श्री० शिवाजी महाराज व त्यांचे ' लंगोटें ' आज कांहीं निराळयाच पोषाखांत दिसत आहेत. युरोपांत जर्मनीनें युद्ध सुरू केल्यामुळें हें रूपांतर झालें आहे हें जरी खरें मानलें तरी सत्य गोष्ट केव्हांतरी कालावधीनें कां होईना पण ' खरी ' ठरते हाच यांतील प्रतितार्थ होय. श्री० शिवाजी महाराज स्वराज्य संस्थापक असून त्यांचे मावळे योद्धे होते इतकेंच नाहीं तर अफझुलखानाचा वध ' स्वसंरक्षणार्थ ' च झालेला आहे असें आजच्या अधिकाऱ्यांकडून स्पष्ट सांगण्यांत येत आहे. अर्थात कालाय तस्मै नम: असेच उद्गार मुखांतून बाहेर पडूं लागतात !

पण आह्मी लोक० टिळकांच्या नाडीच्या परीक्षेचा जो काल सांगत आहोत त्याकाळीं वर सांगितलेली परिस्थिती नव्हती. त्याकाळीं श्री० शिवाजी महाराजांची गणना बंडखोरांत गणली जात होती आणि त्यांचे ' लंगोटे ' मावळे गडी बंडखोरांचे भागीदार गणले जात होते. तसेंच कांहीं ' राजकारणासाठीं ' मुसलमान ' बिबी ' लाडकी गणली जात होती. अशा विपरीत काळीं ' प्लेग ' नावाच्या रोगाचें बिऱ्हाड आचानक येऊन पडलें मग काय विचारतां ? या तिऱ्हाइताच्या अकालीं आगमनानें राज्यकर्ते आणि प्रजाजन यांचीं हृदयें एक समयावच्छेदेंकरून भेदरून गेलीं. राजकर्त्यांनी वैद्यकीय मंडळांतून निरनिराळे

उपाय शोधून काढले आणि हा रोग संसर्गीक आहे असें ठरल्यामुळें रोग्यांची तपासणी सुरू झाली. अधिकाऱ्यांचा हेतू नसतांही प्रजाजनास ती जाचक होऊं लागली. या तपासणीचा हृदयद्रावक परिणाम पुणें शहरावर झाला व त्याचा कळस तेथील अधिकारी मि. ऱ्यांड व दुर्दैवी मि. आयर्स्ट यांच्या खुनांत झाला. आपण सद्‌हेतूनें सुरू केलेल्या तपासणीचा परिणाम अशा खुनांत व्हावा हें पाहून अधिकारी वर्ग साधारण चिडला आणि थोडें स्पष्ट बोलणाऱ्या वर्गावर त्या रागाचा परिणाम घडला यांत कदाचित् अविचारी पणा झाला असेल पण तो निसर्गाच्या विरुद्ध झाला असें मात्र ह्मणतां यावयाचें नाहीं,

हा परिणाम पुणें शहरावर असा घडला. पुण्याच्या शनिवारच्या किल्यावर मराठी भगवें निशाण खालीं काढून इंग्रजी तांबडे निशाण उभारणाऱ्या नातूंवंशजांस कारागृहवास भोगावा लागला. पण एव्हढ्यानें राग शमला जाईना ह्मणून लोक० टिळकांवर राजद्रोहाचा आरोप ठेऊन तो शमविण्याचा प्रयत्न करण्यांत आला. या वेळची खरी परिस्थिती मोठी चमत्कारिक होती. खुद्द पुण्याच्या तपासणीसंबंधानें जर विशेष प्रकारचे जहाल लेख प्रसिद्ध झाले असतील तर ' केसरी ' वर्तमानपत्रांत ते खासच प्रसिद्ध झाले नव्हते इतकेंच नाहीं तर त्यावेळीं वर्तमानपत्रें लक्षलावून वाचणाऱ्यांच्या तोंडून असेही उद्गार निघाले होते कीं आपल्या पुण्याचा ' केसरी ' शेपूट घालून ' ग्राम ' केसरी बनला. त्यांत पूर्वीचा जोम राहिला नाहीं. पण मि. ऱ्यांड यांच्या खुनानें संतप्त झालेलें मन कसें स्वैराचरण करूं लागलें पहा. या वेळीं अधिकाऱ्यांनी दहा अंक मोजले असते तर पुढील इतिहास साफ बदलून कदाचित आजचे लोकमान्य कायमचे रा० रा० च राहिलें असतें ! पण तसें झालें असतें तर वावनकशी सोन्याचा कस जनतेला समजताना.

' केसरी ' वरील राजद्रोहाचा हा पहिला खटला मुंबई मुक्कामीं सुरू झाला या खटल्याची हकीकत सर्व श्रुतच आहे पण या खटल्यामुळें पाच चार गोष्टी ध्यानांत ठेवण्यासारख्या घडून आल्या. पहिली गोष्ट लोक० टिळकांस जामीन

देण्याची होय. जामीन घेणें किंवा न घेणें हें राजद्रोहाच्या कायद्यान्वयें सर्वस्वी न्यायाधिशाच्या खुषीवर असल्यामुळें आरंभीची चवकशी करणाऱ्या माजिस्ट्रेटांना लोकमान्यांच्या रक्ताचा खाऊं तुरुंगांतील 'रक्त बीजा' स अर्पण केला. पुढें जमिनावें अपील पुण्याच्या दीडशहाण्यापुढें निघालें. या विलायती नानाफडणविसांस मोठाच पेच येऊन पडला. सामाजिक सुधारणेसंबंधानें जिव्हेला स्वैर सोडणें निराळें आणि कायद्याचा खरा पण गोड अर्थ बसविणें निराळें हें आमच्या पुण्याच्या रावसाहेबांच्या तत्काळ लक्षांत आलें. पण कसें झालें तरी ते बोलून चालून नानाफडणवीस पडले. त्यांस मुत्सद्देगिरी थोडीच सोडून जाणार होती. त्यांनीं डोक्यांतील मेंदूला खूप हेलकावे देऊन असा मतितार्थ काढला कीं 'आज शनिवार आहे. एक दिवसानें काय होतें. सोमवारीं पाहून घेऊं.' याला म्हणतात मुत्सद्देगिरी आणि अजब वल्ली 'लोक॰ टिळकाजवळ नव्हती किंवा नाहीं म्हणून तर त्याचे आजन्म धिंडवडे निघाले! पुण्याची मुळामुठा नदी समुद्रास येऊन मिळेल असें त्यावेळीं पुष्कळास वाटलें होतें पण ती सह्याद्रीच्या एका भगदाडांत अचानक गुप्त झाली! या मुत्सद्देगिरीनें लोक॰ टिळक तुरुंगांतच अडकून पडले. सगळया लोकांच्या तोंडचें पाणी पळालें पुण्याच्या तोफेंत आयत्या वेळीं बाजरी भरली गेल्यामुळें तिनें रंतुक खाली आणि पुण्याचा 'बामण' पोकळ कासोट्याचाच ठरला!

या जगांत इच्छित हेतूप्रमाणें कार्य घडून आलें असतां त्याबद्दल कोणासच कांहीं वाटत नाहीं. पण आशेची निराशा झाली असतां मूढ जन गूढांत पडतात. खरोखर पाहिलें असतां अशा प्रसंगीं ईश्वराचा हेतू कांहीं तरी निराळाच आहे याचें ज्ञान आम्हां मानवीयांस नसल्यामुळें हें गूढ पडतें. खरोखर तत्वतः त्यांत गूढ असें कांहींच नसतें आणि गोष्ट गूढाचा स्फोट झाल्यानंतर सहज समजून येतें. पुण्याच्या रावसाहेबांनी वर लिहिल्याप्रमाणें 'मुत्सद्देगिरी' केली खरी पण त्यामुळें 'भरंवशाच्या म्हशीला टोणगा' झाल्यामुळें जनतेंत अत्यंत उद्विग्नता प्राप्त झाली. इतकेंच नाहीं तर लोक॰ टिळकांस कायदेशीर सवलत मिळण्याचा मार्ग असतांही 'गुन्हेगार' ठरण्या पूर्वीच तुरुंगांतील साधी कैद भोगावी

लागणार या अपूर्व योगाचा त्वेष त्यांच्या हृदयांत कोलाहल करूं लागला 'सोमवारीं पहू' या रवसाहेबी सूत्रांत आणखी एक गूढ होतें. सोमवारीं हें अपील रावसाहेबापुढें न निघतां एक रहीम भक्तापुढें निघावयाचें होतें तेव्हां रावसाहेबांस एका दगडानें दोन आंबे पाडल्याचाही आनंद झाला असल्यास नवल नाहीं. पण विपरित परिस्थितीमुळें लोकांचें मन विशेषच निराशामय झालें; आणि मौज तर यांतच असते. मानवीय प्राणी निराशेच्या समुद्रांत गटंगळ्या खात असतां एकाएकीं पैलतिरी सुखरूप पोंचतां आलें म्हणजे तो ईश्वरी शक्तीचें कौतुक करूं लागतो. असे चमत्कार हर घडीं घडत असतां महामूर्ख मानव ईश्वराच्या अस्तित्वाबद्दलच जेव्हां उहापोह करूं लागतो तेव्हां त्याच्या शहाणपणाची कींवच येते! असो. पुण्याच्या 'रामांत राम नाहीं पण रहिमांत तरी रहिमत्व आहे कीं नाहीं. हें तपासून पाहण्याची चमत्कारिक वेळ प्राप्त झाली या अपिलाच्या सुनावणीचा मुकदमा न्यायमूर्ति बद्रुद्दिन तय्यबजी यांच्या समोर निघाला. न्याय० बद्रुद्दिन राष्ट्रीय सभेचे भक्त होते हें खरं पण रावसाहेब रानडेही त्या बयेचे 'उदव उदव' करणारांपैकीं होते किंबहुना तिचे जवळच होते. मग अशा जनकानें जर ऐन प्रसंगीं 'घात' केला तर बिचाऱ्या रहित भक्तानें 'हाजी मग्लिक' केल्यास फारसें वावगें झालें नसतें पण ईश्वरी लीला अगाध आहे. रामांत राम नसला तरी रहिमांत रहीम निःसंशय होता.

REFBK-0019192

# आधुनिक फटके !

फटका पहिला.

## गांधी-वाक्सुधा.

एक वेळ अवश्य वाचा, व महात्मा गांधींचें अमोल ध्येय
मगीं बाणा. किं. ३ आणे ट. खं. वेगळा.

प्रल्हाद बाळकृष्ण सरदेशमुख.
सेंचरी प्रेस, मोहन बिल्डिंग, गिरगांव; मुंबई.

---

खरी व उत्कृष्ट शाई पाहिजे असल्यास आमच्या

## कॉसेंट्रेड इंक टॅब लॉइड्स्

ह्याच वापरा, ह्याच वड्या "कलकत्ता" व "अर्काच्या
ड्या" ह्या नांवानें सर्वत्र प्रसार पावून पसंत ठरल्या आहेत.
अनुभव घेतलेले लोक बक्षिसांच्या व इतर सवलतींनीं न फसतां
ाच वड्या वापरात. ह्यांची शाई केमिकल टेस्टला उतरून
युरोपिअन ऑफिससांही पसंत पडलेली आहे. १०० वड्यांस
१ रु. वगैरे खेरीज. आजच लिहा.

मुंबई एजंटस्:—
हिंदी वस्तु प्रसारक मंडळ.
गिरगांव-मुंबई नं. ४

मॅनेजर—कॉन्सेंट्रेड इंक डेपो.
४६१ बुधवार पेठ. पुणें सिटी.
एजंटस पाहिजेत.

# व्यापाऱ्यांनो आधी हें वाचा ?

**ताप मग तो कोणत्याही प्रकारचा असो त्यावर**

शेंडे

एग्यू मिक्श्चर

हल्लींचे काळांत अत्यंत खात्रीचा व स्वस्त उपाय असेल तर तो शेंडे एग्यु मिक्श्चर वापरणें हा एकच होय. बा. किं. १० आणे डझनास ५॥ रु. मोठी स्पेशल साईज १ रु. ड. १० रु. तीन डझन मागविल्यास ताप पाहण्याचें थर्मामिटर फुकट.

**गजकर्णाचें रजिष्टर राक्षसी मलम.**

एकाच दिवसांत हटकून गुण देणारें बा. किं ४ डझनास २।

इतर मालाचा क्याटलॉग मागवा.

**शेंडे आणि कंपनी मुंबई नं. ४**

---

॥ श्रीगजानन ॥

## मेसर्स शेरेकर आणि कंपनी.

यांची

**खलबत्ता छाप**

सँपल पकेट ८।. ] **मुखशुद्धिका** [ रतली डबा ।॥

यानें तोंडास रुची येते. मळमळणें थांबतें, अन्न पचन होतें, शिवाय खाण्यास स्वादिष्ट आहे.

**मे. शेरेकर आणि मंडळी**

जनरल मर्चन्ट, खेमराजचाळ, खंबाटा गल्ली खेतवाडी मुंबई.